| जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड. | |
|---|---|
| वेब साईट :- www.nanded.gov.in | ई-मेल :- nandedrdc@gmail.com |
| दूरध्वनी क्र. :- (०२४६२) २३५०७७ | फॅक्स क्र. :- (०२४६२) २३८५०० |
| जा.क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष /टे-१/सिआर- | दिनांक ०७.०४.२०२० |

वाचाः- सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**विषयः-** कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून परदेशातुन, परराज्यातुन, जिल्हयाच्या बाहेरुन नांदेड जिल्हयात प्रवारा करून आलेल्या नागरिकांची माहिती कळविणे बाबत.

**आदेश,**

जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हिड १९) हा विषाणूमुळे पसरत चाललेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

तसेच कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या अधिकाराचा वापर करुन नांदेड जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नांदेड जिल्हयात परदेशातुन, परराज्यातुन, जिल्हयाच्या बाहेरुन जिल्हयात प्रवास करून आलेल्या नागरिकांची माहिती घेण्यात आली आहे. तथापि **अशी व्यक्ती, जी परदेशातुन, परराज्यातुन व परजिल्हयातुन प्रवास करुन आली आहे,** परंतु सदर व्यक्तीने स्वतहून केलेल्या प्रवासाची माहिती प्रशासनास दिली नाही / प्राथमिक तपासणी देखील करुन घेतली नाही, अशा व्यक्तींनी किंवा अशा व्यक्तींना ओळखणा-या नजीकच्या व्यक्तींनी संवंधीत तहसिलदार यांना दुरध्वनी / भ्रमणध्वनी व्दारे संवंधीतांची माहिती कळवावी. जेणेकरुन संवंधीत व्यक्तींची तपासणी करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यास प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेस सुलभ होईल.

तसेच सर्व संबंधीत तहसिलदार यांनी स्वतःसदर कामी लक्ष देऊन त्यांच्यास्तरवरुन अशी माहिती संकलित करावी व त्यांच्याकडील व जनतेतुन प्राप्त होणारी माहिती दररोज श्रीमती संतोषी देवकुळे, उपजिल्हाधिकारी (लसिका), भ्रमनध्वनी क्रमांक ९४२२९६१०९० जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचेकडे द्यावी.

(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड

<u>प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.</u>

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रतिलीपी पूढील कार्यवाहीस्तव.</u>

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायत, जि.नांदेड

जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

७०५

Scanned with CamScanner